नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०६/२०२६ (शुक्रवार )

---

## काटोल येथे मातम मिरवणुक बंदोबस्तास मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची भेट
## मातम मिरवणूक शांततापूर्ण वातावरणात संपन्न

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुर ग्रामीण जिल्हयात मोहरमनिमित्त कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

दिनांक २६/०६/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी काटोल येथे मातम मिरवणुक बंदोबस्ताला प्रत्यक्ष भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी त्यांनी बंदोबस्तावर नियुक्त पोलीस अधिकारी व अंमलदारांशी संवाद साधून आवश्यक सूचना दिल्या तसेच मिरवणूक शांततापूर्ण, सुरक्षित व सुरळीत पार पडावी यासाठी दक्ष राहण्याचे निर्देश दिले.

पोलीस प्रशासनाने पूर्वनियोजन करून संवेदनशील ठिकाणी आवश्यक पोलीस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्थापन तसेच सतत पेट्रोलींग ठेवून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखली. पोलीस प्रशासन, स्थानिक शांतता समितीचे सदस्य,मोहरम समितीचे पदाधिकारी तसेच नागरिक यांच्या उत्कृष्ट समन्वयामुळे काटोल येथील मोहरम मातम मिरवणूक शांततापूर्ण वातावरणात सुरळीतपणे पार पडली.




ज्ञानार्जन केंद्र
नॅशनल बॅंड



# १२५.६६५ किलोग्रॅम गांजा आणि गांजा वाहतुक करणारे वाहन असा एकुण ३५ लाख १३ हजारांचा मुद्देमाल जप्त देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक २६/०६/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहा पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन देवलापार यांच्या नेतृत्वाखाली देवलापार पोलीसांनी अंमली पदार्थाविरोधात मोठी कारवाई करून १२५. ६६५ किलो गांजा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार असा एकुण **३५,१३,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

दिनांक २६/०६/२०२६ रोजी देवलापार पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई कामी जुने देवलापार पोलीस स्टेशन समोर अचानक नाकाबंदी लावली होती. त्या दरम्यान त्यांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशिर माहीती प्राप्त झाली की, अंमली पदार्थ गांजाची वाहतुक केली जाणार आहे. पोलीस त्याअनुषंगाने पोलीस सापळा रचुन तयारीत असतांना नाकाबंदी दरम्यान **रात्री ०२.१० वाजताच्या सुमारास एक सिल्वर रंगाची संशयीत कार येताना दिसली.**

परंतु सदर कार चालकाने पोलीसांना पाहुन नाकाबंदी पासुन काही अंतरावरूनच पलटुन पुन्हा जबलपुरच्या दिशेने वेगाने निघुन गेला. पोलीसांनी तात्काळ सदर वाहनाचा पाठलाग केला. कार चालक मानेगाव टेक जवळ त्याची कार रस्त्याच्या बाजूला उभी करून कार लॉक करून अंधाराचा फायदा घेऊन जंगलात पळून गेला. पोलीसांनी पंचासमक्ष लॉक तोडुन कार ची झडती घेतली असता कारच्या डिक्कीमध्ये एकूण १२६ पाकिटे मिळून आली . नमुद पाकीटांमध्ये १२५.६६५किलोग्रॅम गांजा अंमली पदार्थ मिळुन आला.

पोलीसांनी पंचासमक्ष १२५.६६५ किलो ग्रॅम गांजा एकुण किंमती २५,१३,३००/— रूपये आणि होंडा सिटी कार क्रमांक युपी १६ एपी २०४३ किंमती १०,००,०००/— रूपये चा, असा एकुण किंमत ३५,१३,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम ८(क),२०(ब) (ii) (सी) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. साखळी पुरावे जोडुन नागपुर ग्रामीण पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत आहेत.



# पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील रस्ता सुरक्षा हद्दीतील अपघातप्रवण ठिकाणी रस्ता सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तथा श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल आणि पोलीस निरीक्षक श्री सुमित परतेकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांनी दिनांक २३/०६/२०२६ रोजी कोंढाळी पोलीस स्टेशन हद्दीतील अपघातप्रवण ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान मनोहर सेलिब्रेशन परिसर तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील साई मंदिर परिसरातील रस्ता सुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.

मनोहर सेलिब्रेशन परिसरात वाहनचालकांच्या नजरेस अडथळा ठरणारा जाहिरात फलक हटविण्यात आला. तसेच गावाच्या प्रवेशमार्गावर वाहनांचा वेग नियंत्रित राहावा यासाठी बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. याशिवाय दोन्ही ठिकाणी वाहनचालकांना धोकादायक ठिकाणांची आगाऊ सूचना मिळावी व त्यांचे लक्ष वेधले जावे यासाठी मुख्य रस्त्यावर आवश्यक सुरक्षा चिन्हे करण्यात आली आहेत.तसेच स्पीड ब्रेकरबाबत वाहनचालकांना आगाऊ सूचना मिळावी यासाठी आवश्यक सुरक्षा चिन्हे करण्यात आली आहेत.


या उपाययोजनांमुळे वाहनचालकांना अपघातप्रवण ठिकाणांची आगाऊ कल्पना मिळून वाहनांचा वेग नियंत्रित राहण्यास मदत होणार असून रस्ता सुरक्षिततेस अधिक बळकटी मिळणार आहे. नागपूर ग्रामीण पोलीस नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करून सुरक्षित वेगाने वाहन चालविण्याचे आवाहन करीत आहेत.


GO SLOW




PARK AVENUE
माँ जगदेवा वर्क्स





## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद.

दिनांक २५/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन पारशिवणी आणि उमरेड यांनी अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ३८६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन पारशिवणी येथे** आरोपी नामे १) शैलेष मारोती डडमल, वय ३२ वर्ष रा.माहूली त.पारशिवनी, २) वैकंट जगतराम चटप,वय ५२ वर्ष, रा. माहूली त.पारशिवनी हे ५२ तासपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद, आहे तसेच १) विकेश ठगनजी पाहाडे, वय ३६ वर्ष,रा. माहूली, त. पारशिवनी २) लिलाधर ढोंडबाजी भोंगा, वय ५० वर्ष, रा. माहूली, ता. पारशिवनी हे ५२ तासपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद, आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे धनराज रामचंद गाठीबाधे, वय ४९ वर्ष, रा. अभ्यंकर चौक उमरेड हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन

आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद. **असे एकुण महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ३ गुन्हे नोंद आहे.**

## पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ३ गुन्हे नोंद

दिनांक २५/०६/२०२६ आणि २६/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन पारशिवणी येथे येथे **आरोपी क्रं १) विकास सुरेन्द्र कठाने,वय २१ वर्षे,रा शिवटेकडी पारशिवनी** हा मौजा खारी ले आउट पारशिवनी येथे अंमली पदार्थाचे सेवन करतांना मिळुन आला. आरोपी क्रं २) **आदित्य भिवाजी चौधरी, वय २० वर्ष, रा. प्रभाग क्रं १३,गोवारी मोहल्ला, पारशिवणी, जि.नागपुर,** हा मौजा तहसील कार्यालय पारशिवणी चे समोरील मैदानाते अंमली पदार्थाचे सेवन करतांना मिळुन आला आणि आरोपी क्रं ३) **गौरव शंकर कनोजे, वय २२ वर्ष, रा. जुन्या बसस्थानकाच्या मागे, पारशिवणी, जि.नागपुर** हा मौजा तहसील कार्यालय पारशिवणी चे समोरील पुलावर अंमली पदार्थाचे सेवन करतांना मिळुन आले. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक २५/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन वडोदा, मौदा, खापा, मोहपा पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू व इतर साहित्य असा एकुण ५,९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी १) मिथुन शेषराव वाघमारे, आजनगाव ता. मौदा,२) विवेक प्रेमदास मेश्राम,वय ४४ वर्षे रा. धानला,ता. मौदा,३) रोशन जयदेव ठाकरे, वय ३० वर्षे,रा. चिचोली , ता. मौदा,आणि ४) मंगेश दसाराम गावंडे, वय ३३ वर्षे ,रा. चिचोली,ता.

मौदा यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी राहुल उर्फ पिंटु प्रकाश मुळे,वय ३२ वर्षे ,रा माहालगाव ता. कामठी याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी शेषराव नागो उइके ,वय ५५ वर्ष ,रा सोनपुर ता सावनेर जि नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी महीला आरोपीवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**नमुद कारवाईत एकुण ३३३० मिली देशी दारू, ४७ लिटार मोहाफुल दारू असा एकुण ५,९००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने